# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. ०१ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ७२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## नारळ दिलेल्या कर्मचाऱ्यांनाच पुन्हा बोलावण्याची फोर्डवर वेळ

**नवी दिल्ली :** विविध उद्योगांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय)चा वापर झपाट्याने वाढत असून अनेक कंपन्या मनुष्यबळाऐवजी एआयच्या मदतीने कामकाज अधिक वेगवान आणि कमी खर्चात करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, एआयच्या मर्यादा अद्याप कायम असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. अमेरिकेतील वाहन उत्पादक कंपनी फोर्डला याचा फटका बसला असून, उत्पादन प्रक्रियेत आलेल्या अडचणींमुळे कंपनीला कामावरून कमी केलेल्या अनुभवी अभियंत्यांनाच पुन्हा सन्मानाने कामावर बोलवावे लागले आहे.


## पाहिजेत

श्री VARAD CONSTRUCTION

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.


## थोडक्यात वार्ता

### चिंतेची बातमी, 1901 नंतर भारतात सर्वात कमी पाऊस असलेला पाचवा जून

**नवी दिल्ली :** भारतात १९०१ पासूनच्या नोंदीनुसार यावर्षी जून महिन्यात पाचव्या क्रमांकाचा सर्वात कमी पाऊस झाला आहे. दरम्यान, नैऋत्य मान्सून पुढील दोन ते तीन दिवसांत दिल्लीसह हरियाणा, पंजाब, राजस्थान आणि संपूर्ण जम्मू-काश्मीरमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचे भारतीय हवामान विभागाने मंगळवारी सांगितले. देशात जून महिन्यात सरासरी १६५.३ मिमी पावसाची अपेक्षा असताना केवळ ९९.५ मिमी पाऊस झाला आहे, जो सरासरीपेक्षा ३९.८ टक्क्यांनी कमी आहे. देशातील ३६ हवामान उपविभागांपैकी २४ उपविभागांत (६५ टक्के) पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे, तर तीन उपविभागांत (१० टक्के) अत्यंत कमी पाऊस झाला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नैऋत्य मान्सून १६ मे रोजी अंदमान आणि निकोबार बेटांवर पोहोचला होता. केरळमध्ये मान्सूनचे आगमन ४ जून रोजी झाले, जे सामान्य तारखेपेक्षा (१ जून) तीन दिवस उशिरा होते. मंगळवारपर्यंत नैऋत्य मान्सूनने आग्नेय आणि ईशान्य भारत, मध्य भारताचे अनेक भाग आणि वायव्य भारताच्या काही भागांत प्रगती केली आहे.

### आसारामला सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा नाहीच

**नवी दिल्ली :** अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणात शिक्षा भोगत असलेल्या आसारामला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. अंतरिम जामीन देण्यास सर्वोच्च न्यायालयाने सध्या नकार दिला असून, प्रथम राजस्थान सरकारची बाजू ऐकली जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या खंडपीठाने सुनावणीदरम्यान, आसाराम प्रभावशाली व्यक्ती आहेत. त्यामुळे जामीन अर्जावर निर्णय घेण्यापूर्वी सर्व बाजूंचा विचार करणे आवश्यक आहे, असे निरीक्षण नोंदवले. याप्रकरणी न्यायालयाने राजस्थान सरकारला नोटीसही बजावली आहे. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश यांनी सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की, शिक्षा स्थगित करण्याचा सध्या कोणताही विचार नाही. केवळ जीवाला गंभीर धोका निर्माण होईल अशी आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यासच या मागणीचा विचार केला जाईल. तसेच या बाबीकडे लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी राज्य सरकारला दिले.

### मुंबईत पावसाची संततधार, अनेक भागांमध्ये पाणी साचले

**मुंबई :** मागील दोन - तीन दिवसांपासून मुंबईत पावसाने दमदार हजेरी लावली आहे. मंगळवारीही सकाळपासून पावसाने जोरदार हजेरी लावली. पाऊस सक्रीय होत असल्याने मुंबईकरांना दिलासा मिळाला आहे. मंगळवारी सकाळी ८ ते सायंकाळी ७ या कालावधीत शहरात मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. या कालावधीत शहर विभागात ४१.०३ मिमी, पूर्व उपनगरात ५३.२७ मिमी, तर पश्चिम उपनगरात ५४.०६ मिमी पावसाची नोंद झाली, तर मुलुंडसह काही भागांमध्ये सकाळी पाणी साचण्याचे प्रकार घडले, तर सायंकाळी पावसाने पुन्हा एकदा जोरदार हजेरी लावल्यानंतर अंधेरी सबवेसह काही भागांमध्ये पाणी साचण्याचे प्रकार घडले होते. त्यानंतर या सर्व भागांमधील पाण्याचा निचरा झाल्यानंतर परिसरातील वाहतूक सुरळीत झाली होती.

### आशियाई स्पर्धेसाठी भारताच्या महिला क्रिकेट संघाची घोषणा

**मुंबई :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (BCCI) महिला निवड समितीने सप्टेंबर २०२६ मध्ये जपानमधील ऐची-नागोया येथे होणाऱ्या आशियाई खेळांसाठी भारतीय महिला क्रिकेट संघाची घोषणा केली आहे. हरमनप्रीत कौर संघाची कर्णधार असेल, तर स्मृती मंधानाला उपकर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. चीनच्या हांगझू येथे २०२३ मध्ये झालेल्या आशियाई खेळांमध्ये सुवर्णपदक जिंकल्यामुळे भारतीय संघ गतविजेता म्हणून या स्पर्धेत उतरेल. नुकत्याच झालेल्या महिला टी-२० विश्वचषकात सहभागी झालेल्या बहुतांश खेळाडूंचाच संघात समावेश आहे. केवळ यास्तिका भाटियाला संघातून वगळण्यात आले आहे. संघात अनुभवी क्रिकेटपटूंसोबतच युवा प्रतिभेचाही समावेश आहे. फलंदाजी विभागात शेफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्स, दीप्ती शर्मा आणि यष्टीरक्षक-फलंदाज रिचा घोष यांचा समावेश आहे. जी. कमलिनी यांचा संघात दुसरी यष्टीरक्षक म्हणून समावेश करण्यात आला आहे.

## पाणीपुरवठा विभागाच्या कार्यालयासमोरच साचले 'जलतळे'; पहिल्याच पावसात व्यवस्थेची पोलखोल

### टीव्ही सेंटरकडून सेंट्रल नाक्याकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर तुडुंब पाणी; शेजारी नाला असूनही निचरा नाही





हिंदू प्रकाशवार्ता | सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात झालेल्या पहिल्याच पावसात प्रशासनाच्या पावसाळापूर्व तयारीचा फज्जा उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. टीव्ही सेंटरकडून सेंट्रल नाक्याकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर, जिल्हा परिषदेच्या उपअभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा विभाग) कार्यालयासमोर मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचले. विशेष म्हणजे, पाणीपुरवठ्याची जबाबदारी असलेल्या विभागाच्या कार्यालयासमोरच पाणी साचल्याने नागरिकांनी आश्चर्य व्यक्त करत प्रशासनावर टीका केली.

**"स्वतःच्या कार्यालयासमोर साचलेले पाणी काढता येत नसेल, तर ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याची कामे किती चांगली होत असतील?" असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.**

रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे दुचाकी, चारचाकी वाहनचालक आणि पादचाऱ्यांची मोठी गैरसोय झाली. पाण्याखाली रस्त्यावरील खड्डे दिसत नसल्याने अपघाताचा धोका वाढला असून वाहनचालकांना अतिशय सावधपणे प्रवास करावा लागत आहे. हा रस्ता एमजीएम रुग्णालय, शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालये आणि सेंट्रल नाका परिसराकडे जाणारा महत्त्वाचा मार्ग असल्याने दररोज हजारो नागरिक याच रस्त्याचा वापर करतात.

आश्चर्याची बाब म्हणजे संबंधित कार्यालयाच्या अगदी शेजारीच पावसाचे पाणी जाण्यासाठी नाला आहे. तरीही पाण्याचा निचरा झाला नाही. पाणी साचल्यानंतरही कोणतीही तातडीची उपाययोजना करण्यात आली नसल्याचे दिसून आले.

पहिल्याच पावसात शहरातील प्रमुख रस्त्यांची अशी अवस्था होत असेल, तर पुढील पावसाळ्यात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. पावसाळ्यापूर्वी नालेसफाई आणि जलनिस्सारणाची कामे झाल्याच्या दाव्यांवरही या घटनेमुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या ठिकाणी तातडीने पाण्याचा निचरा करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात आणि यासाठी जबाबदार असलेल्या संबंधित विभागाची चौकशी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## राशनचा 300 क्विंटल गहू काळा बाजारात विक्रीसाठी जाणारा माल पोलिसांनी पकडला

### स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाची मोठी कामगिरी गंगाखेड रोड पालम रोड कारवाई

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**परभणी:** गोरगरिबांना खाण्यासाठी दिलेला माल राशन दुकानदार त्यांचा माल त्यांना कमी कमी देऊन त्यांच्या तोंडातून अन्न काढून असा जमा झालेला गोरगरिबांचा माल हा काळ्याबाजारात विक्रीसाठी जात असलेला 300 क्विंटल गहू स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने पकडला आहे. ही कार्यवाही सोमवार दिनांक 29 जून रोजी गंगाखेड पालम रोडवर करण्यात आली



हे स्वस्त धान्य प्रणालीतील असल्याचा संशय व्यक्त करत आणि गुन्हे शाखेच्या पथकाने अवैध धंद्याची माहिती काढत गंगाखेड शहरात गस्त घालत असताना या पथकाला एका वाहनातून अवैधरित्या काळ्या * बाजारात चढ्या दरानेविक्री साठी जाणारा स्वस्त धान्य प्रणालीतील गहू घेऊन जात आहे असल्याची माहिती गोपनीय या माहितीचे मिळाली या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाने गंगाखेड ते पालम कडे जाणाऱ्या रस्त्यावर एम एच 26 45 या क्रमांकाच्या ट्रकला पकडले सदरील वाहनांमध्ये प्रत्येकी 50 किलो वजनाचे 600 कट्टे होते पोलिसांनी एकूण सहा लाख रुपये किमतीच्या 300 क्विंटल गहू पकडला आहे वाहन चालक शेख अजीम शेख अजीज यांच्याकडे धान्य बाबत विचारणा केली असता त्याने वाहतूक व विक्रीचा परवाना नसल्याचे सांगितले या वाहनासह मुद्देमाल पुढील कारवाईसाठी गंगाखेड पोलिसात हजर करण्यात आला ही कार्यवाही स्थानिक गुना शाखेचे साहेब पोलीस निरीक्षक अशोक जायभाय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश सवंडकर पोलीस अंमलदार लक्ष्मण कांगणे नेताजी गीते अनिल राठोड यांच्या विशेष पथकाने केली .

## जनरल उपेंद्र द्विवेदी निवृत्त; जनरल धीरज सेठ नवे सैन्य प्रमुख

**नवी दिल्ली :** भारतीय लष्कराचे प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी मंगळवारी आपल्या पदावरून निवृत्त झाले. निवृत्तीपूर्वी त्यांनी नवी दिल्लीतील राष्ट्रीय युद्ध स्मारकावर जाऊन शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी त्यांनी आपल्या कार्यकाळातील लष्कराच्या कामगिरीचा आढावा घेत नव्या नेतृत्वाला शुभेच्छा दिल्या.

जनरल द्विवेदी म्हणाले की, गेल्या 2 वर्षांत भारतीय लष्कराने प्रत्येक आघाडीवर सज्जता, संतुलन आणि सतर्कता कायम ठेवली. ऑपरेशन सिंदूर हे या तयारीचे महत्त्वपूर्ण उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच उत्तर सीमेवरील ऑपरेशन स्नो लेपर्ड अंतर्गत भारतीय लष्कराची तैनाती पूर्ण ताकदीने आणि उच्च सतर्कतेसह करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पश्चिम सीमेवरही सैन्याने संयम आणि जबाबदारीने आपली भूमिका बजावल्याचे त्यांनी नमूद केले.

राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित प्रत्येक प्रकरणात भारतीय लष्कराने स्पष्ट उद्दिष्ट, शिस्त आणि जबाबदारीच्या भावनेने कर्तव्य बजावले असून, या काळात भूदल, नौदल आणि वायुदल यांच्यातील समन्वय अधिक बळकट झाल्याचे त्यांनी सांगितले. तिन्ही दलांनी समान दृष्टिकोन, परस्पर विश्वास आणि उत्कृष्ट समन्वयाने कार्य केले, असेही ते म्हणाले.

## गुलमंडीतील मछलीखडक भागात ड्रेनेज व सिमेंट रस्ता कामांचा शुभारंभ

### नगरसेवक ऋषिकेश जैस्वाल यांच्या पाठपुराव्याला यश; नागरिकांच्या हस्ते भूमिपूजन, प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मध्य विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक १५ अंतर्गत गुलमंडी येथील मछलीखडक परिसरात अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या ड्रेनेज व सिमेंट कॉँक्रिट रस्ता कामांचा शुभारंभ नागरिकांच्या हस्ते करण्यात आला. या विकासकामांमुळे परिसरातील नागरिकांचा पाणी साचणे, चिखल व खराब रस्त्यांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.



नगरसेवक ऋषिकेश प्रदीप जैस्वाल यांच्या पाठपुराव्यामुळे या कामांना मंजुरी मिळाली आहे. या अंतर्गत वसंत भवनसमोरील गल्लीत नवीन ड्रेनेज लाईन टाकण्यात येणार असून त्यासोबत सिमेंट कॉँक्रिट रस्त्याचे बांधकामही करण्यात येणार आहे. तसेच मछलीखडक परिसरातील विविध गल्ल्यांमध्ये सिमेंट कॉँक्रिट रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत.

कामाच्या शुभारंभप्रसंगी नगरसेवक ऋषिकेश जैस्वाल यांनी प्रभागातील नागरिकांच्या मूलभूत सुविधा प्राधान्याने उपलब्ध करून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. विकासकामांना मंजुरी मिळवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी त्यांचा सत्कार करून आभार व्यक्त केले.

## हॉटेल आम्रपाली येथील एसटी बसचा अधिकृत थांबा रद्द; प्रवाशांची गैरसोय आणि चालकांशी गैरवर्तन नडले

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** खुलताबाद तालुक्यातील पळसवाडी येथील हॉटेल आम्रपाली रेस्टॉरंट चा अधिकृत एसटी बस थांबा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने (MSRTC) तातडीने रद्द केला आहे . प्रवाशांच्या तक्रारी, अस्वच्छता आणि हॉटेल चालकांकडून एसटी कर्मचाऱ्यांना झालेली शिवीगाळ व गैरवर्तन या कारणांमुळे हा निर्णय घेण्यात आला असून, ३० जून २०२६ पासून या थांब्यावरील बस फेऱ्या बंद करण्यात आल्या आहेत . याबाबत सविस्तर वृत्त असे की, छत्रपती संभाजीनगर विभागाकडून हॉटेल आम्रपाली रेस्टॉरंटला (मालक. दत्तात्रय कचरू खोसरे) महामंडळाच्या ३० साध्या बसेससाठी अधिकृत थांबा मंजूर करण्यात आला होता . मात्र, गेल्या काही काळापासून या हॉटेलबाबत प्रवासी आणि चालक-वाहकांकडून सातत्याने गंभीर तक्रारी प्राप्त होत होत्या .

महाराष्ट्र एसटी कामगार संघटना (धुळे) आणि शिव परिवहन वाहतूक व कामगार सेना यांच्या तक्रारींची दखल घेत, विभाग नियंत्रक (धुळे) यांच्या अहवालानंतर छत्रपती संभाजीनगरच्या विभाग नियंत्रकांनी हा थांबा रद्द करण्याचा अंतिम निर्णय घेतला . हॉटेल चालकाने आपल्या आवारातून एसटी महामंडळाच्या नावाचे किंवा अधिकृत थांब्याचे सर्व फलक आणि जाहिराती तातडीने काढून घ्याव्यात, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे . यानंतरही महामंडळाच्या नावाचा वापर केल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे .या निर्णयाची प्रत माहिती आणि अंमलबजावणीसाठी मुंबई मध्यवर्ती कार्यालय, प्रादेशिक व्यवस्थापक, तसेच धुळे, जालना, जळगाव, नाशिक या विभागांसह संबंधित आगारांच्या व्यवस्थापकांना पाठवण्यात आली आहे .

थांबा रद्द होण्याची मुख्य कारणे

**सुविधांचा अभाव व अस्वच्छता:** हॉटेलमध्ये प्रवाशांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध नव्हत्या, तसेच तिथे मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता आढळून आली होती .

**अन्नाचा निकृष्ट दर्जा:** हॉटेलमधील खाद्यपदार्थांच्या दर्जाबाबत प्रवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती .

**कर्मचाऱ्यांना अपमानास्पद वागणूक:** हॉटेल चालकांकडून एसटीच्या चालक व वाहकांना वारंवार शिवीगाळ, गैरवर्तन आणि अपमानास्पद वागणूक दिली जात होती . या संदर्भातील काही व्हिडिओ सोशल मीडियावरही व्हायरल झाले होते, ज्यामुळे महामंडळाची प्रतिमा मलिन होत होती .

**परवाना मुदत संपणे:** संबंधित हॉटेलचा परवाना कालावधी १९ मे २०२६ रोजीच संपला होता . त्यानंतर देण्यात आलेली तात्पुरती मुदतवाढ आता प्रशासनाने पूर्णपणे रद्द केली आहे .

## टीसीएस प्रकरणी निदा खानच्या जामीन अर्जावरती सहा जुलैला निर्णय

**नाशिक :** शहरभर गाजलेल्या बहुचर्चित टीसीएस प्रकरणातील संशयित आरोपी दानिश खान आणि निदा खान यांच्या जामीन अर्जावरील अंतिम सुनावणी आता ६ जुलै रोजी होणार आहे. यापूर्वी या प्रकरणात अनेकदा सुनावणीच्या तारखा पडल्या असून, अंतिम निर्णय अद्याप प्रलंबित असल्याने या प्रकरणातील सस्पेन्स आणखी वाढला आहे.

या संवेदनशील प्रकरणात सरकार पक्ष आणि बचाव पक्ष या दोन्ही बाजूंचा जोरदार युक्तिवाद आधीच पूर्ण झाला आहे. त्यामुळे आता केवळ न्यायालयाचा अंतिम निर्णय येणे एवढीच प्रक्रिया बाकी आहे. मात्र, विविध तांत्रिक कारणांमुळे हा निर्णय जाहीर होऊ शकलेला नाही, परिणामी सुनावणीची तारीख वारंवार पुढे जात असल्याचे चित्र आहे.

दरम्यान आज न्यायालयाकडून अंतिम निर्णय येणे अपेक्षित होते. मात्र, न्यायालयाने आता पुढील अंतिम सुनावणी ६ जुलै रोजी निश्चित केली आहे. त्यामुळे संशयितांना जामीन मिळणार की त्यांचा मुक्काम जेलमध्येच राहणार, याकडे दोन्ही पक्षांसह संपूर्ण नाशिककरांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणाचे गांभीर्य आणि संवेदनशीलता पाहता, जनतेमध्येही याविषयी प्रचंड उत्सुकता आहे. ६ जुलै रोजी

## अन्न सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करा; अन्न व औषध प्रशासनाचे खाद्य व्यवसायिकांना कडक आवाहन

### आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार परभणीत विशेष मोहीम; नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांचे परवाने होणार निलंबित किंवा रद्

**परभणी :** राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्न मिळावे या उद्देशाने अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी २४ जून २०२६ रोजी सर्व खाद्य व्यवसाय चालकांसाठी 'व्यापक अन्नसुरक्षा अनुपालन आदेश' (कॉम्प्रेसिव्ह फूडqty सेफ्टी कंप्लायन्स ऑर्डर) जारी केला आहे. 'सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र' हे ध्येय साध्य करण्यासाठी व्यवसाय आणि प्रशासन यांच्या संयुक्त सहभागातून हा आदेश लागू करण्यात आला आहे. यानुसार सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट, ढाबे, कॅन्टीन, स्वीट मार्ट, बेकरी आणि केटरिंग आस्थापनांना अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत निर्धारित नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे.



या नवीन आदेशानुसार सर्व खाद्य व्यवसाय चालकांनी आपल्या व्यवसाय स्थळी मूळ नोंदणी प्रमाणपत्र किंवा परवाना ग्राहकांना दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे हॉटेल व स्वयंपाकघर परिसरात उच्चस्तरीय स्वच्छता राखणे, कीटक नियंत्रणासाठी नियमित उपायोजना करणे आणि ग्राहकांना सुरक्षित व मोफत पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. आरोग्याला घातक असणाऱ्या बाबींना अटकाव करण्यासाठी वापरलेल्या खाद्यतेलाचा पुनर्वापर पूर्णपणे टाळण्याचे निर्देश देण्यात आले असून, वर्तमानपत्र किंवा इतर कोणत्याही छापील कागदामध्ये अन्नपदार्थ देणे अथवा पॅक करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. याशिवाय आस्थापनेवरील सर्व कर्मचाऱ्यांची नियमित वैद्यकीय तपासणी करणे आणि त्यांना 'फॉस्टॅक' (FoSTaC) अंतर्गत अन्न सुरक्षेचे प्रशिक्षण देणे अनिवार्य आहे.

या व्यापक आदेशाची जिल्ह्यात तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी सहाय्यक आयुक्त ए. ए. चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासन परभणीच्या वतीने २५ जून २०२६ रोजी परभणी येथील हॉटेल राधिका पॅलेस, नारायण चाळ येथे जिल्ह्यातील सर्व प्रमुख हॉटेल, रेस्टॉरंट, बेकरी आणि केटरिंग व्यावसायिकांची एक महत्त्वाची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सहाय्यक आयुक्तांनी उपस्थित व्यवसायिकांना आयुक्त तुकाराम मुंढे यांनी जारी केलेल्या आदेशाची सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले. तसेच या सर्व नियमांचे तात्काळ व काटेकोरपणे पालन करण्याच्या कडक सूचना दिल्या. अन्न व औषध प्रशासन विभागाकडून सध्या संपूर्ण परभणी जिल्ह्यासह राज्यभर अन्नसुरक्षा नियमांच्या अंमलबजावणीसाठी विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान कोणत्याही हॉटेल किंवा खाद्य व्यवसाय केंद्रात नियमांचे उल्लंघन होत असल्याचे आढळून आल्यास, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ अंतर्गत संबंधित आस्थापनेचा परवाना थेट निलंबित किंवा रद्द करण्याची कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

# संपादकीय

## शालेय बसवरील झाड कोसळल्याची दुर्घटना दुर्दैवी

मुंबईच्या चेंबूर परिसरात एका खाजगी शाळेच्या बसवर रस्त्याच्या कडेला असलेले महाकाय झाड कोसळून झालेल्या भीषण अपघातात ११ वर्षांच्या विहान श्रीवास्तव या निष्पाप विद्यार्थ्याचा झालेला मृत्यू अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक आहे. या दुर्घटनेत किमान १० विद्यार्थी गंभीररित्या जखमी झाले असून, त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना केवळ एक नैसर्गिक आपत्ती किंवा अपघात म्हणून सोडून देता येणारी नाही. मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागाचा आणि स्थानिक प्रशासनाचा ढिसाळ कारभार व निष्काळजीपणा या निष्पाप बालकाच्या मृत्यूला थेट कारणीभूत आहे, असा घणाघाती आरोप आता केला जात आहे. प्राथमिक माहितीनुसार, चेंबूरमधील ११ नंबर रोडवरून विद्यार्थ्यांना शाळा सुटल्यानंतर घरी सोडण्यासाठी जात असलेल्या बसवर हे झाड अचानक कोसळले. झाडाचा प्रचंड भार बसच्या छतावर पडल्याने बसचे मोठे नुकसान झाले आणि आत बसलेल्या चिमुरड्यांमध्ये एकच घबराट पसरली. स्थानिक नागरिक, पोलीस आणि अग्निशमन दलाने तातडीने धाव घेत बचावकार्य सुरू केले आणि झाडाच्या फांद्या कापून विद्यार्थ्यांना बाहेर काढले. दुर्दैवाने, यामध्ये विहानला आपले प्राण गमवावे लागले. दरवर्षी पावसाळ्याच्या तोंडावर आणि पावसाळ्यात मुंबईत झाडे कोसळण्याच्या शेकडो घटना घडतात, मात्र तरीही पालिकेची यंत्रणा धोकादायक झाडांच्या फांद्या छाटण्याबाबत कमालीची सुस्त का असते, याचे उत्तर आता आयुक्तांना द्यावे लागेल. मुंबईकरांकडून कोट्यवधी रुपयांचा कर वसूल करणारी महानगरपालिका नागरिकांना आणि विशेषतः शाळकरी मुलांना साधी सुरक्षाही देऊ शकत नसेल, तर या प्रशासनाचा काय फायदा? रस्त्यांच्या कडेला असलेली जुनी आणि धोकादायक झालेली झाडे शोधून त्यांची वेळेवर छाटणी करणे किंवा ती काढून घेणे हे पालिकेचे मूलभूत कर्तव्य आहे. मात्र, पालिका अधिकारी केवळ कागदोपत्री पाहणीचा फार्स करतात आणि प्रत्यक्षात जमिनीवर कोणतीही ठोस कारवाई होत नाही. चेंबूरमधील हा रस्ता रहिवासी आणि शाळांच्या बसेसच्या वाहतुकीसाठी मुख्य असताना, तिथल्या धोकादायक झाडाकडे दुर्लक्ष करणे हा अक्षम्य गुन्हा आहे. मुख्यमंत्र्यांनी डान्सबारवर बंदी आणण्यासारखे धाडसी निर्णय घेऊन पळवाटा शोधणाऱ्यांना दणका दिला आहे, ही कौतुकास्पद बाब आहे. परंतु, त्याच वेळी मुंबईतील सामान्य जनतेच्या रोजच्या जगण्याशी आणि सुरक्षेशी जोडलेल्या अशा गंभीर मुद्द्यांवर पालिका प्रशासनाला कधी व कसा दणका मिळणार, हा मोठा प्रश्न आहे. एका आई-बापाचा एकुलता एक विहान प्रशासनाच्या या 'नाकर्तेपणामुळे' कायमचा गेला आहे. या दुर्घटनेची केवळ वरवरची चौकशी करून चालणार नाही. ज्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे या झाडाची छाटणी वेळेत झाली नाही, त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ निलंबित केले पाहिजे. मुंबईतील प्रत्येक शाळकरी मुलाचा प्रवास सुरक्षित करण्यासाठी आता तरी पालिकेने झोपेतून जागे व्हावे, अन्यथा संतप्त मुंबईकर रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाहीत.

# "तुम्ही दिल्या भाकरीचे, बाबा... आज तुकडे कोण करत आहे? : समाजाच्या आत्मपरीक्षणाची हीच वेळ!"

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या संपूर्ण आयुष्याचा संघर्ष केवळ एका जातीसाठी केला नव्हता. त्यांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळावा, प्रत्येकाला समान संधी मिळावी आणि अन्यायाच्या साखळ्या तुटाव्यात यासाठी लढा दिला. त्यांनी दिलेले शिक्षण, संविधान, मतदानाचा अधिकार, स्वाभिमान आणि संघटन ही संपूर्ण समाजासाठी अमूल्य देणगी आहे. आज मात्र समाजात एक वेदनादायक चित्र दिसून येते. ज्यांच्या हातात बाबासाहेबांनी शिक्षणाची मशाल दिली, त्यांच्यातील काही जण त्याच मशालीने स्वतःच्या घरालाच आग लावताना दिसतात. काहीजण समाजात वैचारिक एकतेऐवजी मतभेदांची बीजे पेरत आहेत. ही परिस्थिती कोणत्याही एका व्यक्तीची नाही; ती संपूर्ण परिवर्तनवादी चळवळीची चिंता आहे.एका ठिकाणी कवि संदेश कर्डक असे ही म्हणतात की,"तू दिल्या भाकरीचे भीमा ते तुकडे मागतायत..." हे केवळ शब्द नाहीत, तर समाजाच्या अंतर्मनातील वेदना आहेत. बाबासाहेबांनी आपल्याला अधिकारांची भाकरी दिली; पण आज काही लोक त्या भाकरीचे तुकडे करून समाजालाच विभागण्याचा प्रयत्न करत आहेत. विचारांची ताकद कमी करून व्यक्तिपूजा, गटबाजी आणि स्वार्थी राजकारणाला महत्त्व दिले जात आहे. याहूनही मोठी शोकांतिका म्हणजे दलित समाजातील विविध घटकांमध्ये कृत्रिम भिंती उभ्या करण्याचे प्रयत्न. महार, मांग, मातंग, चर्मकार, भटके-विमुक्त, बौद्ध किंवा इतर वंचित घटक या सर्वांच्या दुःखाचा इतिहास समान आहे. अन्यायाची जखम समान आहे. मग संघर्षाच्या वाटेवर फूट कशासाठी?

याच फुटीवर सनातनी, जातीयवादी आणि विषमतावादी मानसिकतेला बळ मिळते. समाजात जेव्हा एकमेकांवर संशय निर्माण होतो, तेव्हा परिवर्तनाची गती मंदावते. म्हणूनच इतिहास वारंवार सांगतो की, जेव्हा शोषित समाज एकत्र आला, तेव्हा परिवर्तन घडले; आणि जेव्हा तो विखुरला, तेव्हा शोषण अधिक बळकट झाले.अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या शाहिरीतून श्रमिक, वंचित आणि बहुजन समाजाच्या वेदना जगासमोर मांडल्या. त्यांनी एकतेचा, श्रमाचा आणि स्वाभिमानाचा संदेश दिला. त्यांची स्वप्ने होती शिक्षित, संघटित आणि जागृत समाज. परंतु समाजात जर द्वेष, मत्सर आणि अंतर्गत संघर्ष वाढत गेले, तर त्या स्वप्नांनाच तडा जातो. मात्र संपूर्ण चित्र निराशाजनक नाही. आजही लाखो तरुण बाबासाहेबांचा अभ्यास करतात, संविधानाचा सन्मान करतात, "जय भीम" हा घोष स्वाभिमानाने देतात आणि सामाजिक न्यायासाठी काम करतात. हेच परिवर्तनाचे खरे आशास्थान आहे.आज गरज आहे ती व्यक्तींना नव्हे तर विचारांना स्वीकारण्याची. बाबासाहेबांनी कधीही आंधळ्या भक्तीचा पुरस्कार केला नाही. त्यांनी चिकित्सक बुद्धी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेक यांचा आग्रह धरला. त्यामुळे समाजातील मतभेद संवादाने मिटले पाहिजेत; संघर्ष हा अन्यायाविरुद्ध असला पाहिजे, आपापसांत नव्हे.

प्रत्येक तरुणाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे मी समाजाला जोडत आहे की तोडत आहे? माझ्या कृतीने बाबासाहेबांचे स्वप्न मजबूत होत आहे की कमकुवत? आज शिक्षण, रोजगार, संविधानिक मूल्ये, सामाजिक समता आणि बंधुता यांवर नव्याने भर देण्याची गरज आहे. जाती-जमातींच्या नावावर एकमेकांविरुद्ध उभे राहण्याऐवजी समान प्रश्नांवर एकत्र येणे, हीच बाबासाहेबांना खरी आदरांजली ठरेल. बाबासाहेबांनी आपल्या आयुष्यात कधीही केवळ एका समाजाचा विचार केला नाही. त्यांनी संपूर्ण भारतातील शोषित, वंचित, दुर्बल, कष्टकरी आणि स्त्री-पुरुषांना समान अधिकार मिळावेत यासाठी आयुष्य झोकून दिले. शिक्षण, संघटन आणि संघर्ष हा त्यांनी दिलेला मंत्र आजही तितकाच महत्त्वाचा आहे. त्यांनी दिलेली "राज्यघटना" ही केवळ कायद्यांची पुस्तिका नाही, तर मानवी प्रतिष्ठेची सनद आहे. त्या राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, न्याय आणि बंधुतेचे मूल्य दिले.परंतु आज एक वेदनादायक वास्तव आपल्या समोर उभे आहे. बाबासाहेबांनी दिलेल्या अधिकारांचा लाभ घेऊन उभे राहिलेले काही लोक त्यांच्या विचारांपासून दूर जाताना दिसतात. काहीजण समाजाला जोडण्याऐवजी तोडण्याचे काम करतात. वैचारिक मतभेद लोकशाहीत स्वाभाविक आहेत; पण मतभेदाचे रूपांतर वैमनस्यात झाले, तर त्याचा सर्वाधिक फटका समाजालाच बसतो. म्हणूनच बांधवांनो बाबासाहेबांनी लिहिलेली घटना सांभाळून ठेवा. तिचा सन्मान करा तिचे संरक्षण करा.

आज सर्वात मोठा प्रश्न आहे तो समाजातील फूट निर्माण करण्याचा. जाती, पोटजाती, गट, संघटना, पक्ष, व्यक्ती यांवरून निर्माण होणारे संघर्ष समाजाची ऊर्जा संपवतात. बाह्य अन्यायाविरुद्ध लढण्याऐवजी आपणच एकमेकांविरुद्ध उभे राहिलो, तर परिवर्तनाची वाट अधिक कठीण होते.बाबासाहेबांनी "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" असे सांगितले. या मंत्रातील "संघटित व्हा" हा शब्द आज सर्वाधिक महत्त्वाचा आहे. संघटना म्हणजे केवळ राजकीय एकत्रीकरण नाही; तर विचारांची, मूल्यांची आणि उद्दिष्टांची एकजूट आहे. शिक्षित तरुण जर परस्परांवर संशय घेऊ लागले, तर समाजाच्या प्रगतीचा वेग मंदावतो.

इतिहास सांगतो की, ज्या समाजात अंतर्गत संघर्ष वाढतो, त्या समाजाचा फायदा नेहमीच शोषणवादी प्रवृत्तींना होतो. म्हणूनच कोणतीही परिवर्तनवादी चळवळ स्वतःच्या घरातील मतभेद संवादाने सोडवते. कारण एकमेकांवर विजय मिळवण्यात नव्हे, तर अन्यायावर विजय मिळवण्यात खरे यश आहे.

लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित नाही. लोकशाही म्हणजे संवाद, सहिष्णुता, परस्पर सन्मान आणि विविध मतांचा आदर.

बाबासाहेबांनी स्वतः अनेक विषयांवर कठोर भूमिका घेतल्या; पण त्यांनी तर्क, पुरावा आणि विवेक यांना कधीही सोडले नाही. आज सोशल मीडियाच्या युगात अफवा, अपप्रचार, अपमानास्पद भाषा आणि द्वेषपूर्ण चर्चा यांमुळे समाजात संशयाचे वातावरण निर्माण होत आहे. विचारांवर चर्चा करण्याऐवजी व्यक्तींवर हल्ले होतात.म्हणे शाहू फुले आंबेडकर यांचा महाराष्ट्र नाही, अशी गरळ ओकणाऱ्या प्रवृत्तीला थांबवणे आवश्यक आहे. अशा आपल्या समाजातील व्यक्तीने उद्गार काढल्यानंतर मनाला वेदना होतात दुःख होते.आजही अनेक तरुण शाहू फुले बाबासाहेबांचे साहित्य वाचतात, संविधानाचा अभ्यास करतात, स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवतात, समाजातील वंचित मुलांना शिकवतात, रक्तदान शिबिरे, शैक्षणिक मदत, वाचनालये, अभ्यासिका, सामाजिक उपक्रम राबवतात. हेच खरे "भीमाचे वाघ" समाजाला पुढे नेणारे शिक्षित तरुण आहेत. समाजाची आशा ही अशाच सकारात्मक कामांमध्ये आहे. आज तरुण वर्ग बाबासाहेबांच्या आणि अण्णाभाऊंच्या जयंतीच्या निमित्ताने विविध उपक्रम राबविताना दिसतात. तरीदेखील समाजातील विविध घटकांमध्ये कृत्रिम भिंती उभ्या करण्याचे प्रयत्न हे नवीन नाहीत. इतिहासात अनेकदा "फोडा आणि राज्य करा" हे धोरण वापरले गेले. म्हणूनच आज महार, मांग, मातंग, चर्मकार, भटके-विमुक्त, ओबीसी, आदिवासी किंवा इतर कोणताही वंचित घटक असो, त्यांचे समान प्रश्न शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सन्मान आणि न्याय हेच आहेत. संघर्षही समान आहे. मग परस्पर संघर्ष करून कोणाचे भले होणार? महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांसारख्या महापुरुषांनी कधीही समाजाला विभागण्याचे काम केले नाही. त्यांनी शिक्षण, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यांची मशाल पेटवली. त्या मशालीभोवती समाज एकत्र यावा, अशी त्यांची अपेक्षा होती. तरुण पिढीने भावनिक घोषणांपेक्षा वैचारिक अभ्यासाला महत्त्व दिले पाहिजे. बाबासाहेबांचे नाव घेणे सोपे आहे; पण त्यांच्या विचारानुसार जगणे कठीण आहे. बांधवांनो बाबासाहेबांनी दिलेला संदेश असा होता की,अंधश्रद्धेपासून दूर रहा, चिकित्सक बुद्धी वापरा, संविधानाचा आदर करा आणि स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवा. आज समाजाला गरज आहे ती नव्या वैचारिक नेतृत्वाची. असे नेतृत्व जे समाजात द्वेष नव्हे, तर विश्वास निर्माण करेल. जे व्यक्तिपूजेपेक्षा तत्त्वांना महत्त्व देईल. जे मतभेदांना संवादातून सोडवेल. जे तरुणांना शिक्षण, कौशल्य आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देईल.

बांधवांनो,आपण स्वतःला एक प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे आपण बाबासाहेबांचे नाव फक्त घोषणांमध्ये घेतो की त्यांच्या विचारांना आपल्या जीवनात उतरवतो? आपण समाजाला जोडतो की तोडतो? आपण आपल्या पुढील पिढीला द्वेषाचा वारसा देतो की विचारांचा?

लक्षात ठेवले पाहिजे की, महापुरुषांचे विचार हे कोणत्याही एका समाजाची मक्तेदारी नसतात. ते संपूर्ण मानवजातीची संपत्ती असतात. बाबासाहेबांनी दिलेली राज्यघटना प्रत्येक भारतीयासाठी आहे. त्यांनी दिलेला समतेचा संदेश प्रत्येक माणसासाठी आहे. त्यांनी दिलेला स्वाभिमान प्रत्येक वंचितासाठी आहे.म्हणूनच आज गरज आहे ती घोषणा देण्यापेक्षा मूल्ये जगण्याची. जय भीम म्हणताना न्यायासाठी उभे राहणे, संविधानाचा सन्मान करणे, शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देणे, समाजातील दुर्बल घटकांना हात देणे आणि अंतर्गत मतभेदांवर संवादाने मार्ग काढणे हीच बाबासाहेबांना खरी आदरांजली ठरेल.

आज आम्ही पाहत आहोत, ऐकत आहोत आजच्या या अलीकडच्या काळात बाबासाहेबांना डावलून समाजा समाजात फूट पाडणारे विचार कोणाचेही असोत, ते समाजाचे नुकसानच करतात. बांधवांनो बाबासाहेबांनी आपल्यासाठी खूप काही करून ठेवलं आहे फक्त आपल्याला एकच काम करायचं आहे ते म्हणजे "संविधानाचे" संरक्षण करायचे आहे.

बाबासाहेबांनी दिलेल्या"संविधानाचे" रक्षण करणे ही प्रत्येक सजग नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे.

बाबासाहेबांनी देलेले 'संविधान" केवळ आरक्षण, कायदे किंवा अधिकार नव्हते; त्यांनी दिलेला तो स्वाभिमान, विचार आणि माणुसकीचा मार्ग. त्या मार्गावर चालताना मतभेद असू शकतात, पण मनभेद नसावेत. कारण समाजाची खरी ताकद एकतेत आहे.

चला, बाबासाहेबांचे विचार ओंजळभर नव्हे तर जीवनभर स्वीकारूया. फूट पाडणाऱ्यांपासून सावध राहूया. समता, बंधुता आणि न्याय यांच्या मूल्यांवर उभा असलेला समाज घडवूया.


**लेखक**
**समाजभूषण रामदास वाघमारे**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं.8888125610**

# बिश्नोई टोळीसह भाडोत्री गुंडांचा बंदोबस्त करणार- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## परदेशातील 'व्हीपीएन कॉल्स' आणि 'मास्किंग'चे जाळे उद्ध्वस्त करणार

मुंबई : परदेशात बसून 'व्हीपीएन' तंत्रज्ञानाचा वापर करत आणि 'मास्किंग'द्वारे मुंबई, पुण्यातील धनिकांना धमकावणाऱ्या बिश्नोई आणि रोहित गोधरा टोळीचे समूळ उच्चाटन करण्यात येईल. या टोळ्या स्वतः मैदानात न उतरता उत्तर प्रदेश आणि बिहारमधून लाख-दोन लाख रुपयांचे भाडोत्री गुंड आणून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. हे लोक काही फार शूरवीर नाहीत, नागरिक-उद्योजकांनी घाबरण्याचे कारण नाही. धमक्या देणारे मूळ आका परदेशात असले, तरी त्यांचे नेटवर्क मोडून काढण्यासाठी केंद्र सरकारच्या मदतीने पावले उचलली जात असून, या भाडोत्री गुंडांवर 'मकोका' लावून त्यांचा पूर्णपणे बंदोबस्त केला जाईल, अशी ग्वाही राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस (Chief Minister Devendra Fadnavis) यांनी मंगळवारी विधानसभेत दिली.

विधानसभेत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी बिश्नोई टोळी आणि शुभम लोणकर यांच्या वाढत्या कारवायांवरून कायमचा बंदोबस्त करण्याबाबत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. या चर्चेत आमदार अस्लम शेख आणि बापूसाहेब पठारे यांनीही उपप्रश्न विचारले. बिश्नोई टोळीच्या नव्या कार्यपद्धतीबाबत (मोडस ऑपरेंडी) माहिती देताना फडणवीस म्हणाले की, या टोळ्यांचे मुख्य आका



तुरुंगात गेल्याने गँगमध्ये फूट पडली असून, आता आरझू बिश्नोई आणि रोहित गोधरा अशा दोन वेगवेगळ्या गँग वर्चस्वासाठी लढत आहेत. परदेशात लपून बसलेले यांचे हस्तक व्हीपीएनद्वारे धमक्यांचे फोन करतात. समोरची व्यक्ती घाबरली नाही, तर ते नाद सोडून देतात; मात्र कोणी घाबरल्याचे दिसल्यास यूपी-बिहारमधून १-२ लाख रुपये देऊन भाडोत्री गुंड मागवले जातात. त्यांच्याकडून घर किंवा दुकानावर हवेत गोळीबार घडवून आणला जातो. हा समोरच्याला मानसिकदृष्ट्या घाबरवून खंडणी उकळण्याचा प्रकार आहे. आतापर्यंत झालेल्या अशा सर्व हल्ल्यांमधील पकडलेले आरोपी हे भाड्याचे गुंड निघाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आमदार अस्लम शेख यांनी २०१४ प्रमाणेच मुंबई पोलिसांचे विशेष 'अँटी-एक्स्ट्रॉशन' पथक अधिक मजबूत करण्याची मागणी केली. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, "मुंबई पोलिसांचा इंटेलिजन्स देशात सर्वोत्तम असून, अशा टोळ्यांचा छडा लावण्यात आपले पोलीस तज्ज्ञ आहेत. दिग्दर्शक रोहित शेट्टी यांच्या बाबतीतही असाच प्रयत्न झाला असता आम्ही आरोपींना पकडून मोक्का लावला होता. आता हे गुंड पोकळ धमक्या देण्याचे काम करत आहेत. एका देशातून ३-४ देशांचे नेटवर्क फिरवून (मास्किंग) फोन केले जात असल्याने तांत्रिक अडचणी येतात, मात्र तरीही पोलीस त्यांचा माग काढत आहेत. यासाठी पोलिसांची विशेष टीम अधिक सक्षम केली जाईल."

**मुंबईसह पुणे, पिंपरी-चिंचवड रडारवर**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड भागातही अशा धमक्यांच्या तीन घटना घडल्याचा मुद्दा आमदार बापूसाहेब पठारे यांनी उपस्थित केला. त्यावर बोलताना फडणवीस म्हणाले, "या टोळ्यांचे मुख्य कॉन्सन्ट्रेशन मुंबई, पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील धनिक वर्गावर आहे. पुण्यातही हवेत गोळीबार करणाऱ्या भाडोत्री गुंडांना आपण तात्काळ अटक करून त्यांच्यावर मकोका लावला आहे. पोलिसांनी यापूर्वीच अनमोल बिश्नोई आणि प्रवीण लोणकरला अटक केली असून ते तुरुंगात आहेत. आता परदेशातून सूत्रे हलवणारा बिश्नोईचा लहान भाऊ (तिसरा बिश्नोई) सक्रिय आहे. या टोळ्या आंतरराष्ट्रीय स्तरावरून चालत असल्याने केंद्र सरकारला संपूर्ण माहिती देण्यात आली असून, या गँगस्टर्सना भारतात परत आणण्यासाठी केंद्रीय यंत्रणांच्या मदतीने कायदेशीर कारवाई सुरू आहे."

# मुंबईतील अनधिकृत नळजोडण्यांवर 90 दिवसांत होणार मोठी कारवाई

## पाणीचोरी रोखण्यासाठी विशेष मोहीम

**मुंबई :** मुंबई शहरातील पाणीटंचाई आणि पाणीचोरीच्या समस्येवर आज विधान परिषदेत गंभीर चर्चा झाली. मुंबईतील वाढत्या पाणीटंचाईला अनधिकृत नळजोडण्या, पाणीचोरी आणि नियोजनातील त्रुटी मोठ्या प्रमाणात कारणीभूत असल्याचे समोर आले आहे. मालवणी, मानखुर्द, कुर्ला, साकीनाका, गोवंडी, कलीना यांसारख्या विविध भागांतील अनधिकृत नळजोडण्या, बेकायदेशीर हॉटेल्स, गॅरेजेस आणि वाहन धुलाई केंद्रांमुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याची चोरी होत असल्याचा मुद्दा भाजप आमदार राजहंस सिंह यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे सभागृहात मांडला. यावर सकारात्मक उत्तर देत, पुढील ९० दिवसांत मुंबई शहरात विशेष मोहीम राबवून सर्व अनधिकृत नळजोडण्या शोधून त्या तात्काळ तोडण्याचे आदेश दिले जातील, अशी स्पष्ट ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सभागृहात दिली.

सभागृहात अधिक माहिती देताना आमदार राजहंस सिंह म्हणाले की, मुंबईला दररोज सुमारे ४,६६५ एमएलडी पाण्याची गरज असताना प्रत्यक्षात ४,१०० एमएलडी पाणीपुरवठा होत आहे, म्हणजेच सध्या ५६५ एमएलडी पाण्याची तूट आहे. मुंबईकर नागरिक नियमितपणे पाणीपट्टी भरत असताना, काही बेकायदेशीर जोडण्यांमुळे नागरिकांच्या हक्काचे पाणी चोरीला जात आहे. अशा सर्व अनधिकृत व्यावसायिक आस्थापनांचे पाणी व वीज कनेक्शन तातडीने तोडण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली. तसेच, उत्तर मुंबईतील गणेश टेकडी, शिव टेकडी, कुरार यांसारख्या उंचावरील भागांमध्ये पाणी पोहोचत नसताना मलबार हिलसारख्या भागात नियमित पुरवठा होतो, ही विसंगती दूर करून गरीब वस्त्यांनाही समान न्यायाने पाणीपुरवठा व्हावा, असे त्यांनी अधोरेखित केले.

**भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना; जलप्रकल्पांचे नियोजन**


भाजप आमदार राजहंस सिंह यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले की, मुंबईच्या भविष्यातील वाढती गरज लक्षात घेऊन शासन विविध स्तरांवर काम करत आहे. यासाठी गारगाई धरण प्रकल्प (440 MLD), मालाड-मनोरी आणि अंधेरी-वर्सोवा येथील डिसॅलिनेशन (Converting seawater into fresh water) प्रकल्प, तसेच दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्प टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे नियोजन सरकारने केले आहे. प्रशासनाने केलेल्या आतापर्यंतच्या कारवाईची माहिती देताना मंत्र्यांनी सांगितले की, जानेवारी २०२६ ते जून २०२६ या अवघ्या सहा महिन्यांच्या कालावधीत २,२५७ अनधिकृत नळजोडण्या तोडण्यात आल्या आहेत. तसेच मालवणी, मानखुर्द, साकीनाका, कुर्ला या भागांतील ४७ गॅरेजेसचा बेकायदेशीर पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. मात्र, सदस्यांनी व्यक्त केलेली चिंता लक्षात घेता, यापुढे अधिकाधिक कडक पावले उचलली जातील आणि ९० दिवसांत विशेष मोहीम राबवून ही कारवाई पूर्ण केली जाईल.

# विकास करार रद्द झाल्यास मुद्रांक शुल्क परतावा बंद, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा विधेयक विधानसभेत सादर

## महसुलाचे नुकसान टाळण्यासह तरतुदींचा गैरवापर रोखण्यासाठी निर्णय

मुंबई : विकास करार रद्द, निरस्त किंवा समाप्त झाल्यास कोणत्याही परिस्थितीत मुद्रांक शुल्काचा परतावा किंवा सवलत दिली जाणार नाही, अशी तरतूद असलेले महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ४८ मध्ये सुधारणा करणारे विधेयक मंगळवारी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत मांडले. राज्याच्या महसुलाचे संरक्षण करणे आणि कायद्यातील पळवाटांचा होणारा गैरवापर रोखणे हा या सुधारणेचा मुख्य उद्देश आहे.

प्रत्यक्ष व्यवहारात असे निदर्शनास आले आहे की, विकास करारांच्या संदर्भात मोठ्या प्रमाणावर मुद्रांक शुल्क भरले जाते. तथापि, व्यावसायिक कारणांमुळे किंवा परस्पर मतभेदांमुळे हे करार पुढील टप्प्यावर रद्द, निरस्त किंवा समाप्त केले जातात आणि त्यानंतर भरलेल्या मुद्रांक शुल्काच्या परताव्यासाठी शासनाकडे अर्ज सादर केले जातात. अशा प्रकरणांमध्ये तथ्य पडताळणी करताना प्रशासकीय अडचणी निर्माण होतात आणि परताव्याचे अनेक दावे वाढतात मुद्रांक शुल्क हा दस्ताच्या अंमलबजावणीवर आकारला जातो; कराराची



प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली किंवा नाही, यावर तो अवलंबून नसतो. त्यामुळे करार रद्द झाला तरी अशा प्रकरणांमध्ये परतावा देणे महसुली दृष्ट्या राज्यासाठी प्रतिकूल व नुकसानकारक ठरत होते. तसेच कायद्यातील सवलतींच्या तरतुदींचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण झाली होती.

राज्याच्या महसुलाचे संरक्षण करणे तसेच कायद्याची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात एकसमान व स्पष्टपणे व्हावी, यासाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ४८ मधील परंतुका नंतर सदर परंतुकाची शिथिलता किंवा परताव्याची तरतूद ही 'करारनाम्याप्रमाणेच' समान मुद्रांक शुल्क लागू होणाऱ्या विकास करारासह इतर कोणत्याही दस्तांना लागू होणार नाही. अशी नोंद करण्यात येणार आहे.

**सद्याच्या तरतुदींमधील पळवाटा बंद**

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ४७ अन्वये विशिष्ट प्रकरणांमध्ये मुद्रांक शुल्क परतावा/ सवलत देण्याची तरतूद असून कलम ४८ (१) मध्ये त्यासाठीची कालमर्यादा नमूद आहे. सध्याच्या तरतुदींमध्ये काही विशिष्ट प्रकरणांकरिता परंतुकाद्वारे जी शिथिलता देण्यात आली होती, तिचा विकास करारांच्या बाबतीत गैरवापर रोखण्यासाठी हे कडक पाऊल उचलण्यात आले आहे. या सुधारणेमुळे रिअल इस्टेट क्षेत्रात आणि मुद्रांक शुल्क विभागात अधिक पारदर्शकता येईल असे स्पष्ट करण्यात आले.

# गंगापूर तालुक्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेची जिल्हास्तरीय पाहणी; शंभर टक्के लसीकरणावर भर

## एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, डॉ. शैलजा कुप्पास्वामी यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : 'माझं गाव आरोग्य संपन्न' अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर गंगापूर तालुक्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि ट्रान्झिट बूथची जिल्हास्तरीय पाहणी करण्यात आली. सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शैलजा कुप्पास्वामी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने लसीकरणाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेत शंभर टक्के लसीकरणावर भर दिला.



पथकाने प्राथमिक आरोग्य केंद्र वाळूज, लिंबेजळगाव, शेंदूरवादा, भेंडाळा, सिद्धनाथ वडगाव, लासूर तसेच उपकेंद्र कायगाव, मालुंजा आणि लिंबेजळगाव येथील अंगणवाडीतील पोलिओ लसीकरण बूथना भेटी दिल्या. तसेच रेल्वे स्थानकावरील ट्रान्झिट टीमच्या कामकाजाचीही तपासणी करण्यात आली.

प्राथमिक आरोग्य केंद्र वाळूज येथे एका बालकाला पोलिओ लसीचे दोन थेंब दिल्यानंतर त्याच्या पालकांशी संवाद साधण्यात आला. आरोग्य विभागाच्या सेवांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत इतर पालकांनीही आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना लसीकरणासाठी बूथवर आणावे, असे आवाहन केले.

पाहणीदरम्यान प्रत्येक बूथवरील अपेक्षित व प्रत्यक्ष लाभार्थ्यांची संख्या, व्हॅक्सीन व्हायल मॉनिटर (VVM), शीतसाखळी (कोल्ड चेन), व्हॅक्सीन कॅरियर, आइस पॅक्स, टॅली शीट, मार्कर तसेच इतर आवश्यक साहित्याची तपासणी करण्यात आली. सर्व केंद्रांवर लसीकरणाचे काम नियोजनबद्ध आणि समाधानकारक पद्धतीने सुरू असल्याचे आढळून आले.

प्राथमिक आरोग्य केंद्र शेंदूरवादा येथे आलेल्या एका गरोदर महिलेशी आणि तिच्या बालकाच्या लसीकरणानंतर जिल्हास्तरीय पथकाने संवाद साधला. आरोग्य विभागाच्या सेवांबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी आणि आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

भेंडाळा प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत कायगाव उपकेंद्राच्या पाहणीनंतर ट्रान्झिट टीमच्या कामकाजाचाही आढावा घेण्यात आला. दोन ट्रान्झिट बूथवर एकूण ३२ बालकांना पोलिओ लसीचे दोन थेंब देण्यात आल्याची नोंद घेण्यात आली.

सिद्धनाथ वडगाव प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत मालुंजा उपकेंद्राला भेट देऊन तेथील अडचणी जाणून घेण्यात आल्या. आशा स्वयंसेविकांना अधिकाधिक लाभार्थींना बूथवर आणण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच वीटभट्ट्यांसह अतिजोखीम (हाय रिस्क) क्षेत्रांना प्राधान्य देत तेथील ० ते ५ वर्षे वयोगटातील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहणार नाही, याची खात्री करण्यात आली.

# 2 जुलैपासून 'VB-GRAM G' अभियानाचा शुभारंभ

## मनरेगाच्या जागी नवी योजना; नऊ तालुक्यांतील निवडक गावांत जनसंमेलन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर** : ग्रामीण रोजगार व्यवस्था अधिक सक्षम व परिणामकारक करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ऐवजी 'विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) – VB-GRAM G' लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यभर या अभियानाची अंमलबजावणी १ जुलै २०२६ पासून सुरू होत असून, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात त्याचा जिल्हास्तरीय शुभारंभ २ जुलै रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रीय स्तरावरील थेट प्रक्षेपणासह होणार आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील नऊ तालुक्यांतील निवडक ग्रामपंचायतींमध्ये जनसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. नव्या अभियानाची माहिती ग्रामस्थांपर्यंत पोहोचविणे, रोजगार हमी योजनांबाबत जनजागृती करणे आणि ग्रामीण नागरिकांचा सहभाग वाढविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

कार्यक्रमास स्थानिक खासदार, आमदार, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला बचतगटांच्या प्रतिनिधी, नोंदणीकृत रोजगार हमी मजूर, युवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

अभियानाच्या निमित्ताने कार्यक्रमस्थळी माहितीपर पोस्टर्स, बॅनर्स, स्टँडीज, यशोगाथांचे सादरीकरण, छायाचित्र प्रदर्शन तसेच मजुरांसाठी पिण्याचे पाणी, सावलीसाठी शेड, प्रथमोपचार पेटी आणि पाळणाघर यांसारख्या मूलभूत सुविधांची व्यवस्था करण्यात येणार आहे.

**निवडक गावे** : छत्रपती संभाजीनगर–लाडगाव, गंगापूर–माहुली, जिकठाणा, सिल्लोड–उंडणगाव, वैजापूर–लोणी बुद्रुक, तीडी, खुलताबाद–विरामगाव, खांडी पिंपळगाव, पैठण–कडेठाण, कन्नड–नादरपूर, सोयगाव–जरंडी, जंगलातांडा तसेच फुलंब्री–चिंचोली बुद्रुक व पाथरी.

या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण रोजगार व आजीविका बळकटीसाठी नव्या टप्प्याची प्रभावी सुरुवात होणार असल्याची माहिती उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनुपमा नंदनवनकर यांनी दिली.

# सोयगांव प्रकल्प अंतर्गत रिक्त अंगणवाडी मदतनीस पदांची भरती प्रक्रिया सुरू

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव, दि.३० जून** : एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सोयगांव तालुक्यातील ( प्रकल्प सोयगांव ग्रामीण अंतर्गत ) असलेल्या नांदातांडा, देव्हारी, सावरखेडा, निंभोरा व तितूर या महसूली गावातील प्रत्येकी १ मदतनीस अशा एकूण ५ रिक्त असलेल्या मदतनीस पदांसाठी पदभरतीची कार्यवाही ३० जून पासून सुरू करण्यात येत आहे.

सदरील भरती प्रक्रिया ही राज्य शासनाच्या शासन निर्णय दिनांक ०२ फेब्रुवारी २०२३ व दिनांक ३० जानेवारी २०२५ मधील नमूद अटी व शर्तीनुसार करण्यात येणार आहे.

मदतनीस पदासाठी शैक्षणिक पात्रता किमान १२ वी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. १२ वी पेक्षा जास्त शिक्षण पुर्ण केलेल्या अर्जदारास शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी २०२५ मध्ये नमूद परिशिष्ट अ नुसार अतिरिक्त गुण देण्यात येईल अतिरिक्त गुण मिळविण्यासाठी अर्जदाराने पदवी, पदव्युत्तर पदवी, डी. एड., बी.एड. एम. एस. सी. आय. टी.अथवा शासनाने ठरविलेल्या समकक्ष संगणक परीक्षा प्रमाणपत्र उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. विधवा अथवा अनाथ , मागास प्रवर्गातील , सेविका / मिनी सेविका / मदतनीस पदाचे किमान २ वर्ष अनुभव असणाऱ्या अर्जदाराला अतिरिक्त गुण देण्यात येईल.

प्रकल्प कार्यालयाकडून पदभरती बाबत जाहिरात संबंधित महसूली गावाच्या ग्राम पंचायत कार्यालय, अंगणवाडी केंद्र, प्रकल्प कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर ३० जून रोजी प्रसिद्ध करून अर्ज स्विकारण्याचा कालावधी दिनांक ०१ जुलै ते १४ जुलै पर्यंत कार्यालयीन कामाचे एकूण १० दिवस (शासकीय सुटीचे दिवस वगळून) निश्चित केली आहे.तरी पद भरती असलेल्या महसुली गावातील पात्र महिला / मुलींनी अर्ज रितसर अर्ज सादर करावे असे आवाहन केले आहे.

# न्यू हायस्कूल पाल विद्यार्थी पालकांचा गौरव पत्र व रोख पारितोषिक देऊन सत्कार कार्यक्रम संपन्न

**फुलंब्री (प्रतिनिध) :** दरवर्षी प्रमाणे याही वर्षी न्यू हायस्कूल पाल येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम, दुतीया, तृतीय आलेल्या विद्यार्थी व पालकांचा गौरव पत्र व रोख पारितोषिक देऊन गुणगौरव करण्यात आला आहे.



माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम क्रमांक हर्षल ज्ञानेश्वर जाधव, दुतीया क्रमांक श्रद्धा शंकर गोल्हारे, तृतीय क्रमांक सुनील आजिनाथ लहाने यांनी असे प्राविण्य मिळवलेले असून उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम क्रमांक गायत्री बाबासाहेब बहादुरे, दुतीया क्रमांक विशाखा सुनील बचुटे, दुतीया क्रमांक कल्याणी राजू सोनवणे यांनी असे प्राविण्य मिळवलेले आहे.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती चंद्रकांत जाधव, शालेय समिति अध्यक्ष चंद्रशेखर भगवान जाधव, उपाध्यक्ष कैलास दगडू जाधव, शालेय समिति सन्मानीय सदस्य सारंगधर मारोती जाधव, ग्रामपंचायत माजी उपसरपंच ज्ञानेश्वर तेजराव जाधव त्याचप्रमाणे जगन्नाथ काका जाधव, सुभाष सुलताने, धोंडूराज ढेपले, उत्तम पांडू जाधव, शंकर गोल्लारे, ज्ञानेश्वर सूर्यभान जाधव, एकनाथ इंगळे, सोनवणे मिस्तरी, ज्ञानेश्वर सोनवणे श्री. सुरडकर आदी पाल गावातील ग्रामस्थ तसेच प्रमुख पाहुणे गजानन मरकड, मिटूसिंह बहुरे, देशमुख सर, मनोज सूर्यवंशी हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन करणारे ज्ञानेश्वर बोरसे बाबासाहेब बोरसे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यावेळी

विद्यार्थी व पालकांचा गौरव पत्र व रोख पारितोषिक देऊन गुणगौरव करण्यात आला आहे, या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक यांनी अत्यंत उत्कृष्ट असे नियोजन केले शेळके मॅडम यांनी सूत्रसंचालन केले असून शाळेचे सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेत मोलाचे योगदान दिले.

# जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, शिवना येथे शालेय व्यवस्थापन समितीची उत्साहपूर्ण वातावरणात स्थापना

अजिंठा प्रतिनिधी सय्यद जमीरोद्दीन

**शिवना, दि. ३० जून** : जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा, शिवना येथे आज शालेय व्यवस्थापन समिती (SMC) गठणाची प्रक्रिया अत्यंत उत्साहपूर्ण व लोकसहभागातून पार पडली. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचे पालक, स्थानिक प्रशासनातील अधिकारी व प्रतिनिधी, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, पंचायत समिती सदस्य शेख सलीम साहेब, ग्रामपंचायत सरपंच डॉ. सलमान खान तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी शिक्षक अब्दुल्ला सर यांनी प्रास्ताविक करताना शालेय व्यवस्थापन समितीचे शाळेच्या सर्वांगीण विकासातील महत्त्व विशद केले. त्यांनी सांगितले की, शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे, पालकांचा शालेय व्यवस्थापनातील सहभाग वाढविणे तसेच शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

यानंतर मुख्याध्यापक मोहम्मद सादी सर यांनी शालेय व्यवस्थापन समितीची रचना, उद्दिष्टे, अधिकार व जबाबदाऱ्या याबाबत उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. समिती गठित करण्याची संपूर्ण कार्यपद्धती स्पष्ट करून शासनाच्या नियमानुसार निवड प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करण्यात आली. उपस्थित पालकांनीही या प्रक्रियेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत लोकशाही पद्धतीने समितीची निवड केली.

यावेळी पंचायत समिती सदस्य शेख सलीम साहेब यांनी पालकांचा सक्रिय सहभाग हा शाळेच्या प्रगतीचा मजबूत पाया असल्याचे सांगून नव्याने गठित समितीला शुभेच्छा दिल्या. ग्रामपंचायत सरपंच डॉ. सलमान खान यांनीही शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायतीमार्फत आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

संपूर्ण कार्यक्रम आनंददायी, उत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात पार पडला. नव्याने गठित झालेली शालेय

# गुलाबराव पाटील कोलते यांनी 77 नवीन डीपींना मंजुरी मिळाल्याची दिली माहिती





**सावळदबारा प्रतिनिधी** : दि. २९ जून रोजी सावळदबारा पंचायत समिती गणामध्ये भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी गावागावात जाऊन शेतकऱ्यांना माहिती दिली. सावळदबारा सह देव्हारी, पिपळवाडी, महालब्धा, मोलखेडा, डाभा, घाणेगाव, नादाताडा, रवळा, जवळा, जामठी, आदी गावांमध्ये जाऊन तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी शेतकऱ्यांना माहिती दिली.

भाजपचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या प्रयत्नांमुळे फर्दापूर जिल्हा परिषद गटासाठी ७७ नवीन डीपींना मंजुरी मिळाल्याची माहिती देण्यात आली.

यावेळी भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी सांगितले की, भाजपचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या पाठपुराव्यामुळे आहेत

फर्दापूर जिल्हा परिषद गटात ७७ नवीन डीपींना मंजुरी भाजपचे अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या पाठपुराव्यास यश . १८ गावांतील सुमारे ४ हजार शेतकऱ्यांना दिलासा

दि 29 जून रोजी सावळदबारा सह परिसरातील शेतकऱ्यांना माहिती देताना भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यानी दिली

# सिल्लोड अजींठा रस्त्यावर सिमेंट घेऊन जाणारा ट्रकचा अपघात



**अजिंठा प्रतिनिधी :** सिल्लोड अजिंठा रस्त्यावर सिमेंट घेऊन जाणारा ट्रकचा अपघात गोळेगाव जवळ हा अपघात झाला आहे या अपघातामध्ये बुलेटचा अक्षरशः चुरा झाला आहे. दुसऱ्या ट्रकला वाचण्याच्या नादामध्ये बुलेट स्वारास उडवले. बुलेट चालक लघुशंकेला बाजूला गेला असल्यामुळे बालम बाल बचावला.

# एमएमआरडीए तिसरी मुंबई विरोधी 124 गाव संघर्ष समिती, रायगड आयोजित आज रोजी करण्यात येणारे निदर्शने आंदोलन स्थगित; बैठक घेण्याचे आश्वासन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड** : १ जुलै २०२६ चे कोकण आयुक्तालयावरील निदर्शने आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सहायक पोलीस आयुक्त नवी मुंबई व सी बी डी पोलीस ठाणे, बेलापूर यांच्या मध्यस्थीने सोमवार दिनांक २९ जुलै २०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता अपर आयुक्त कोकण विभाग श्रीमती फिरोद मुकादम व आयुक्त कोकण विभाग श्रीमती रुबेल अग्रवाल यांच्या दालनात स्वतंत्रपणे दोन बैठका झाल्या. या बैठकीत एमएमआरडीए तिसरी मुंबई विरोधी १२४ गाव संघर्ष समिती, रायगडचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते. या बैठकीत समितीकडून १ जुलैच्या निदर्शने आंदोलन व शेतकऱ्यांच्या भूमिकेसंदर्भात सविस्तर चर्चा झाली. कोकण आयुक्त यांनी तातडीने प्रधान सचिव व आयुक्त एमएमआरडीए यांचेसमवेत बैठक लावण्याचे विनंतीपत्र देत येत्या १० - १५ दिवसात बैठक घेण्याबाबत आश्वासीत केले. याबाबतचे दोन्ही लेखी पत्र एमएमआरडीए तिसरी मुंबई विरोधी १२४ गाव संघर्ष समिती, रायगड समितीकडे दिले असून १ जुलैचे निदर्शने आंदोलन स्थगित करण्याची विनंती प्रशासनातर्फे समितीकडे करण्यात आली. त्या अनुषंगाने एमएमआरडीए तिसरी मुंबई विरोधी १२४ गाव संघर्ष समिती, रायगड आयोजित १ जुलै २०२६ रोजी करण्यात येणारे निदर्शने आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

पोलीस प्रशासन आणि आयुक्त कोकण विभाग यांच्या दालनातील झालेली चर्चा त्यांनी आंदोलन स्थगित करण्याची केलेली मागणी यावर तातडीने उरण पेण पनवेल तालुक्यातील शेतकरी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक बोलावण्यात आली. पी आर पी इंग्लिश मीडियम स्कूल पाणदिवे येथे झालेल्या बैठकीत नव्याने स्थापन झालेल्या एमएमआरडीए तिसरी मुंबई विरोधी १२४ गाव संघर्ष समितीचे अध्यक्ष अनंत पाटील, सल्लागार सुभाष म्हात्रे (माजी तहसीलदार), कार्याध्यक्ष संतोष ठाकूर, समन्वयक सुधाकर पाटील, सरचिटणीस रूपेश पाटील, सर्व सदस्य अविनाश ठाकूर ( जि प सदस्य), कलावती पाटील (सरपंच पिरकोन), अनामिका म्हात्रे सरपंच ( वशेणी), सुरेश पाटील, एड. सत्यवान भगत, मनोहर ठाकूर, प्रकाश पाटील, चंद्रशेखर ठाकूर तसेच पेणचे सदस्य चंद्रकांत पाटील, सुधाकर पाटील तसेच माजी जि प सदस्य महेंद्र ठाकूर, लवेश म्हात्रे इत्यादी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

या बैठकीत विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचेकडून आलेल्या पत्र तसेच झालेल्या चर्चेचा तपशील सादर करून १ जुलैच्या निदर्शने आंदोलनावर चर्चा झाली. व चर्चेअंती सदर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. याबाबत येत्या १०- १५ दिवसात बैठक न झाल्यास स्थगित केलेले आंदोलन भविष्यात अधिक तीव्रपणे करण्याचा इशारा समितीकडून देण्यात आला आहे.मागण्या पूर्ण न झाल्यास लोकशाही व कायदेशीर मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा अनंत पाटील अध्यक्ष, संतोष ठाकूर कार्याध्यक्ष, सुधाकर पाटील समन्वयक, रुपेश पाटील सरचिटणीस यांनी प्रशासनाला दिला आहे.

# सोयगाव तालुक्यातील घोसला येथे विजेची तार तुटून पडल्याने बैलाचा मृत्यू

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव, दि.३० जून** : वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसाने मुख्य वीज तार तुटून रस्त्यावर पडलेली असताना त्यावर गेलेल्या बैलगाडी च्या बैलाला विजेचा धक्का लागून बैल जागीच ठार झाल्याची घटना रविवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास सोयगाव तालुक्यातील घोसला शिवारात जोगेश्वरी रस्त्यावर घडली यामध्ये बैलगाडी मध्ये असलेल्या चार ते पाच जणांनी उड्या मारल्या ने ते बचावले आहेत पेरणी करून घरी येत असताना हा प्रकार घडला.

या घटनेत शेतकरी शब्बीर रुस्तम तडवी व त्यांचे कुटुंबीय थोडक्यात बचावले.ऐन खरीप हंगामात झालेल्या या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

नांदगाव तांडा शिवारातील गट क्रमांक ७३ मध्ये शब्बीर तडवी यांची सुमारे एक हेक्टर शेती आहे. रविवारी पेरणीचे काम पूर्ण करून ते बैलगाडीतून कुटुंबासह घरी परतत होते. दुपारी अचानक पाऊस व वादळी वाऱ्याचा जोर वाढला.



दरम्यान रस्त्यावर येत असताना मुख्य वीजवाहिनीची तार तुटून रस्त्यावर पडली होती.पावसामुळे रस्त्यावर साचलेल्या पाण्यातून बैलगाडी जात असताना बैलाचा पाय जिवंत विद्युत तारेच्या संपर्कात आला.त्यामुळे जोरदार विजेचा धक्का बसून बैलाचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेत शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांनी सतर्कता बाळगून तातडीने गाडीतून उड्या मारल्या.मात्र शेतीसाठी उपयोगी असलेल्या बैलाचा मृत्यू झाल्याने शब्बीर तडवी यांचे एक लाख रु चे नुकसान झाले आहे. खरीप हंगाम सुरू असतानाच बैल गमावल्याने पुढील शेतीची कामे कशी करावीत, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

घटनेची माहिती मिळताच महावितरणचे लाईनमन सूर्यवंशी, पशुवैद्यकीय अधिकारी जोगदंड यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. महावितरण ने घटनेचा पंचनामा केला.

या शेतकऱ्यांला आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# ग्रामीण पोलीस दलातील 9 अधिकारी व अंमलदार सेवागौरवासह निवृत्त; सजविलेल्या वाहनातून दिला भावपूर्ण निरोप

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलातील नऊ अधिकारी आणि अंमलदार आपल्या आयुष्याची ३३ ते ३७ वर्षे समाजाच्या सुरक्षेसाठी समर्पित करून आज, ३० जून रोजी वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. या निमित्ताने पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या सभागृहात एका विशेष आणि भव्य गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा अत्यंत भावपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी सेवानिवृत्त झालेल्या सर्व अधिकाऱ्यांचा त्यांच्या जोडीदारासह आणि कुटुंबियांसह शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

या सोहळ्यात सेवानिवृत्त झालेल्या पोलीस उपअधीक्षक संजय शिवाजी देशमुख (३३ वर्षे सेवा), सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बापुराव जगन्नाथ चव्हाण (३३ वर्षे सेवा), श्रेणी पोलीस उपनिरीक्षक बबन केशवराव मालोदे (३५ वर्षे सेवा), श्रेणी पोलीस उपनिरीक्षक पंढरीनाथ किसन शिंदे (३७ वर्षे सेवा), श्रेणी पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र कृष्णाजी जोशी (३७ वर्षे सेवा), पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश पांडुरंग गंगावणे (३७ वर्षे सेवा), पोलीस नाईक शेषराव किसन मोरे (३४ वर्षे सेवा), सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शिवाजी सखाराम मेंद (३४ वर्षे सेवा) आणि सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शेख मिकन शेख बुद्दन (३४ वर्षे सेवा) यांचा समावेश होता.

निवृत्त सहकाऱ्यांना मार्गदर्शन करताना पोलीस अधीक्षक मा. प्रकाश जाधव म्हणाले की, या अधिकाऱ्यांनी प्रतिकूल परिस्थितीत सण-उत्सवांची पर्वा न करता प्रामाणिक सेवा बजावली आहे. त्यांची शिस्त नवीन पिढीसाठी आदर्श असून पोलीस दल हे कुटुंब म्हणून सदैव त्यांच्या पाठीशी राहील. प्रशासकीय तत्परता दाखवत पोलीस अधीक्षकांच्या निर्देशानुसार सर्व निवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन आणि इतर सर्व कायदेशीर लाभ सेवानिवृत्तीच्या दिवशीच म्हणजेच आजच त्यांच्या हाती सुपूर्द करण्यात आले, ज्यामुळे सर्वांनी समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचा समारोप अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने झाला. पोलीस अधीक्षकांच्या संकल्पनेतून सर्व नऊ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना त्यांच्या कुटुंबासह शासकीय आदराने घरी सोडण्यासाठी फुलांनी व शुभेच्छा फलकांनी सजविलेली विशेष पोलीस वाहने उपलब्ध करून देण्यात आली होती. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतः या वाहनांना निरोप दिला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी प्रभारी पोलीस उपअधीक्षक संजय सहाणे, विनय सोनावणे, पोलीस निरीक्षक आरती पवार, बोमन्ना रयतुवार, संतोष वायचळ आणि पोलीस मुख्यालयातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.


# वाळूज औद्योगिक वसाहत भूसंपादन: जमिनीच्या बदल्यात पर्यायी जमीन व स्वतंत्र भूखंडासाठी शेतकरी आक्रमक

## जिल्हाधिकाऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद



**छत्रपती संभाजीनगर :** नियोजित अति. वाळूज औद्योगिक वसाहत क्षेत्राच्या भूसंपादनाबाबत आज एक अत्यंत महत्त्वाची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात पार पडली. गंगापूर तालुक्यातील आरापूर, सुलतानाबाद आणि गवळी शिवरा येथील बाधित शेतकऱ्यांनी या बैठकीत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्यासमोर आपली गाऱ्हाणी आणि मागण्या मांडल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचे सर्व मुद्दे सविस्तरपणे ऐकून घेतले असून, या संदर्भातील मागण्यांचा सकारात्मक प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवून पुढील निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले. या नियोजित औद्योगिक वसाहतीसाठी तीन गावांमधील एकूण ७६२.०३ हेक्टर क्षेत्राचे भूसंपादन केले जाणार आहे. यामध्ये आरापूर येथील १७१.८० हेक्टर, सुलतानाबाद येथील १७७.६२ हेक्टर आणि गवळी शिवरा येथील ४१२.६१ हेक्टर जमिनीचा समावेश आहे. या सर्व बाधित क्षेत्रातील शेतकरी जमीन दरांच्या वाटाघाटीसाठी प्रशासनाने बोलावलेल्या बैठकीला उपस्थित होते. बैठकीदरम्यान शेतकऱ्यांच्या वतीने अत्यंत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित करण्यात आले. भूसंपादन होत असलेल्या जमिनींचे सर्व मालक हे पूर्णवेळ शेतकरी असून त्यांचे संपूर्ण उत्पन्न या शेतीवरच अवलंबून आहे. त्यामुळे हक्काची जमीन जात असताना, त्यांना लगतच्याच परिसरात दुसरी जमीन खरेदी करता येईल एवढा पुरेसा आणि योग्य मोबदला मिळावा, अशी मुख्य मागणी शेतकऱ्यांनी केली. यासोबतच, अनेक शेतकरी सध्या शेतातच घरे बांधून वास्तव्यास असल्याने, त्यांना घराचा स्वतंत्र मोबदला मिळण्यासोबतच निवासासाठी स्वतंत्र भूखंड उपलब्ध करून देण्यात यावा, अशीही आग्रही मागणी करण्यात आली. या औद्योगिक क्षेत्रात येणाऱ्या आगामी उद्योगांमध्ये आणि तिथल्या विकासकामांमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना प्राधान्याने रोजगार मिळावा आणि शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय कोणत्याही प्रकारे जमिनीचे दर निश्चित केले जाऊ नयेत, या मुद्द्यांवर शेतकऱ्यांनी भर दिला.

शेतकऱ्यांची बाजू ऐकल्यानंतर जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी त्यांना प्रशासकीय नियमांनुसार आधारभूत कमाल दराची सविस्तर माहिती दिली. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार निवासासाठी स्वतंत्र भूखंड दिले जातील, असे सांगत जमीन मालकांना अधिकाधिक वाजवी आणि न्याय्य दर मिळावा यासाठीच या वाटाघाटींचे आयोजन करण्यात आल्याचे स्पष्ट केले. शेतकऱ्यांनी केलेल्या वाढीव मागण्यांबद्दलचा प्रस्ताव त्वरित शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला जाईल आणि तिथून मान्यता मिळाल्यानंतरच पुढील वाटाघाटी होतील, असे जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केले. या प्रसंगी एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी अमित भामरे यांनी या नव्या औद्योगिक वसाहतीमुळे भविष्यात स्थानिक परिसराचा कसा विकास होईल आणि स्थानिकांना त्याचे काय लाभ मिळतील, याविषयी मार्गदर्शन केले. या महत्त्वाच्या बैठकीस जिल्हाधिकाऱ्यांसोबत भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी अमित भामरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी यांसह इतर संबंधित विभागांचे अधिकारी आणि मोठ्या संख्येने बाधित ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.



जगप्रसिद्ध वेरूळ लेणी परिसरात जोरदार पाऊस झाल्याने या ठिकाणचा पर्यटकांना आकर्षित करणारा मनमोहक धबधबा वाहताना दिसत आहे. छाया : संतोष करपे

# मनपातील २५ सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचा आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते गौरव

## दीर्घ व कर्तव्यनिष्ठ सेवेचा सन्मान; शाल, प्रमाणपत्र व पुष्प देऊन सत्कार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत दीर्घकाळ प्रामाणिकपणे आणि कर्तव्यनिष्ठेने सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या २५ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मंगळवारी मनपा आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. शाल, प्रमाणपत्र आणि गुलाब पुष्प देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सहाय्यक आयुक्त नईम अहमद अन्सारी, उप अग्निशमन केंद्र अधिकारी अशोक खांडेकर तसेच अनुरेखक मजहर अली यांच्यासह विविध विभागांतील एकूण २५ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी आयुक्त अमोल येडगे यांनी सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांनी महानगरपालिकेच्या सेवेत दिलेल्या योगदानाचा गौरव करत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या प्रदीर्घ सेवेमुळे प्रशासन अधिक सक्षम होण्यास मोलाची मदत झाल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास मुख्य लेखापरीक्षक शि. बा. नाईकवाडे यांच्यासह महानगरपालिकेतील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सेवाभावी कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांना निरोगी, आनंदी आणि यशस्वी पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# घाटीच्या अफसरबानो नसीमखान 40 वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त

## अपघात विभागातील आरोग्यसेवेचा गौरव; डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते सत्कार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील अपघात विभागात तब्बल ४० वर्षे समर्पितपणे सेवा बजावल्यानंतर कर्मचारी अफसरबानो नसीमखान (मुन्नीमावशी) या सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या प्रदीर्घ, निष्ठावान आणि रुग्णसेवेला वाहिलेल्या कार्याचा गौरव म्हणून अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

घाटी रुग्णालय हे मराठवाड्यातील लाखो रुग्णांसाठी आरोग्यसेवेचे महत्त्वाचे केंद्र असून येथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या समर्पित सेवेवरच ही व्यवस्था उभी आहे. अपघात विभागासारख्या अत्यंत संवेदनशील विभागात चार दशकांहून अधिक काळ सेवा देत अफसरबानो नसीमखान यांनी असंख्य रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोलाची मदत केली. त्यांच्या सेवाभावामुळे त्या सर्वांच्या 'मुन्नीमावशी' म्हणून परिचित होत्या. सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कार्यक्रमात अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी ओपीडी इन्चार्ज कविता नवगिरे, नवाज अहमद, निखिल निर्मळ तसेच घाटी रुग्णालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुख्य अभियंता मृद व जलसंधारण कार्यालय गुरुवारपासून होणार कार्यान्वित; 13 जिल्ह्यांचे असणार कार्यक्षेत्र

**छत्रपती संभाजीनगर :** मृद व जलसंधारण विभागाच्या २७ मे रोजीच्या शासन निर्णयानुसार, छत्रपती संभाजीनगर येथे नव्याने निर्माण करण्यात आलेले 'मुख्य अभियंता मृद व जलसंधारण' कार्यालय येत्या गुरुवारपासून (दि. २ जुलै) अधिकृतपणे कार्यान्वित होणार आहे. या अत्यंत महत्त्वाच्या कार्यालयाचे पहिले मुख्य अभियंता म्हणून हरिभाऊ गिते यांची नियुक्ती करण्यात आली असून, मृद व जलसंधारण आयुक्तांनी त्यांच्याकडे या पदाचा कार्यभार सोपवला आहे. नव्याने सुरू होणाऱ्या या मुख्य अभियंता कार्यालयाचे कार्यक्षेत्र अत्यंत व्यापक असणार आहे. यामध्ये दोन प्रमुख प्रादेशिक विभागांतील छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभाग ८ जिल्हे नाशिक प्रादेशिक विभाग ५ जिल्हे एकूण १३ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे.

हे नवीन कार्यालय पैठण रोडवरील कांचनवाडी येथील 'वाल्मी' (WALMI) परिसरात सुरू होत आहे. येत्या गुरुवार, २ जुलै रोजी दुपारी ठीक १२.०० वाजता या कार्यालयाचे शानदार उद्घाटन होणार असून, त्यानंतर हे कार्यालय पूर्ण क्षमतेने कामास सुरुवात करेल. या संदर्भातील अधिकृत माहिती छत्रपती संभाजीनगर येथील मृद व जलसंधारण विभागाच्या दक्षता व गुण नियंत्रण पथकाचे प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. या नवीन कार्यालयामुळे दोन्ही विभागांतील मृद व जलसंधारणाच्या कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# एमजीएम विद्यापीठातर्फे विद्यार्थी ४५४३ पुस्तकांचे वाटप




**छत्रपती संभाजीनगर, :** विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे आणि ज्ञानसंपदेचा अधिकाधिक विद्यार्थ्यांना लाभ मिळावा या उद्देशाने महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या वतीने ग्रंथालयातील अभ्यासासाठी उपयुक्त असलेली एकूण ४५४३ अभियांत्रिकी पुस्तके विविध शैक्षणिक संस्थांना वाटप करण्यात आली आहेत. या पुस्तक वितरणाचा कार्यक्रम एमजीएमच्या विश्वस्त कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात झाला. यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या हस्ते संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना प्रातिनिधिक स्वरूपात पुस्तकांचे वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमास कुलगुरू प्रा. डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, संचालिका डॉ.परमिंदर कौर, विभागप्रमुख प्रा. पियुष काळे, ग्रंथपाल सखाराम हारकळ, उज्ज्वला इंगोले उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना अद्ययावत शिक्षणासोबतच संदर्भ साहित्याची उपलब्धता वाढावी, ग्रामीण व निमशहरी भागातील शैक्षणिक संस्थांनाही दर्जेदार ग्रंथसंपदेचा लाभ मिळावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. एमजीएमच्या ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या हजारो पुस्तकांचे वर्गीकरण करून विविध अभियांत्रिकी शाखांनुसार संबंधित संस्थांना त्यांचे वितरण करण्यात आले. पुस्तकांचा स्वीकार प्राचार्य प्रविण माळी, प्राचार्य सागर पवार, प्राचार्या सविता नरवडे, मुख्याध्यापिका उषा जाधव आणि उपमुख्याध्यापिका वर्षा पोतदार यांनी केला.

या उपक्रमाअंतर्गत यशोदीप इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (एमसीए) या संस्थेला संगणक अभियांत्रिकी आणि विद्युत अभियांत्रिकी शाखेतील पुस्तके देण्यात आली. तसेच आर. जी. इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीला स्थापत्य, यांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन तसेच अप्लाईड सायन्स या शाखांतील मोठ्या प्रमाणावर पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. याशिवाय एमजीएम क्लोव्हर डेल स्कूल, एमजीएम ज्युनिअर कॉलेज आणि एमजीएम संस्कार विद्यालय यांनाही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन पुस्तकांचे वितरण करण्यात आले.

# स्वराज्य जनजागृती परिषदेच्या प्रथम वर्धापन दिन विविध कार्यक्रमांनी साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** स्वराज्य जनजागृती परिषदेचा वर्धापन दिन विविध स्तरावर गाव तालुका जिल्हा या ठिकाणी वृक्षारोपण रक्तदान परिसर स्वच्छता वृद्ध शेतकऱ्यांचा सत्कार व शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा याचे आयोजन करून वर्धापन दिन मोठ्या प्रमाणात सादरा करवा व समाज जागृती करून जनतेमध्ये समाज व देश हित जोपासण्यासाठी शाळा महाविद्यालय या ठिकाणी उद्बोधन शिबिरे घेऊन साध्या पद्धतीने वर्धापन दिन साजरा करण्यात यावा अशी सूचना अजित देशमुख यांनी सर्व जिल्हाध्यक्ष तालुकाध्यक्ष व पदाधिकारी यांना दिले.

परिषदेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. अजित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली बीड येथे परिषदेची मुहूर्तमेढ रावबण्यात आली.

त्या अनुषंगाने दिनांक भारतीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय एन।। हडको छत्रपती संभाजी नगर येथे दोन दिवसीय विविध उपक्रम राबवून प्रभात फेरी वृक्षारोपण परिसर स्वच्छता वृद्ध शेतकऱ्यांचा सत्कार त्र्यंबक दुर्गाजी मनगटे यांचा करण्यात आला.

तसेच विद्यार्थ्यांची निबंध स्पर्धा घेऊन त्यांचा प्रथम द्वितीय तृतीय क्रमांकाची निवड करून विद्यार्थ्यांना स्वराज्य जनजागृती परिषदेचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य ज्ञानेश्वर गोराडे यांनी प्रमाणपत्र व बक्षीस मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी ह.भ.प. बाबुराव महाराज जाधव हे होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण वैष्णव यांनी केले व आभार प्रदर्शन रामदास साळवे यांनी केले. या कार्यक्रमासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षके इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# सहकार उपनिबंधकपदी पी टी घुगे. भगवान दुधाटे एमडी शिंदे यांना पदोन्नती

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी.



**परभणी :** जगात जर्मनी भारतात परभणी या मनी प्रमाणे जिल्ह्याच्या तीन भूमिपुत्रांनी परभणीकरांची मान अभिमानाने उंचावली आहे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील पदव्युत्तर पदवीधर पि टी घुगे भगवान दुधाटे यांची उपनिबंधक सहकारी संस्था पदी पदोन्नती झाली आहे.

जिंतूर तालुक्यातील दिग्रस येथील रहिवासी पंढरीनाथ घुगे यांची पुणे शहरासाठी उपनिबंधक म्हणून पदोन्नती झाली आहे तर भगवान दुधाटे हे पूर्णा तालुक्यातील देऊळगाव येथील रहिवासी आहेत त्यांची ठाणे येथे उपनिबंधक म्हणून बदली झाली आहे पदोन्नती झाली आहे तर गंगाखेड तालुक्यातील मसला येथील रहिवासी माधव देवराव शिंदे यांची डी विभाग मुंबई येथे उपनिबंधक पदी पदोन्नती झाली आहे यातली भूमिपुत्रांनी परभणी जिल्ह्याचा परभणी जिल्ह्याच्या गौरवशाली इतिहास कायम राखत परभणी जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे . अभिमानाचा आणि गौरव त्यातील त्रिरत्नानी दाखवल्यामुळे परभणी करांतून त्यांच्यावर कौतुकाचावर्षाव होत आहे. त्यांच्या या पदोन्नतीने बदल पी डी देशमुख( मुख्य गुण नियंत्रक अधिकारी कृषी विभाग पुणे )माजी जि प सदस्य अजित मगर कृषी अधिकारी बबन वाघ रवी हरणे बाबासाहेब काळदाते पोलीस निरीक्षक आदी सह कृषी मित्रांनी अभिनंदन केले आहे.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911